एतदर्थ मंडळ-हिंदी परीक्षा, हिंदी परीक्षेच्या प्रसाराचे काम करणाऱ्या खाजगी संस्थांच्या परीक्षांना मंडळाच्या उच्च व निम्न श्रेणी परीक्षांच्या समकक्ष मान्यता देण्या बाबत

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक-हिमाप/१९७६/४६१/२८,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक- २४/११/१९७७

शासन निर्णय:-शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्र. हिमाप/१९७६/२८, दि.१०/६/१९७६मधील नियमावलीच्या नियम ४मध्ये नमूद केल्या प्रमाणे खाजगी संस्थामार्फत घेतल्या जाणाऱ्या संस्थांची नांवे व समकक्ष परीक्षांची यादी प्रसिध्द करण्याचा प्रश्न शासनाचे विचाराधीन होता. या बाबत असा निर्णय घेण्यात आला आहे कि सोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या हिंदी भाषेच्या प्रसाराचे काम करणाऱ्या कांही खाजगी संस्थांकडून १०/६/७६पासून पुढे घेण्यात आलेल्या व घेण्यात येणाऱ्या परीक्षांना एतदर्थ हिंदी परीक्षा मंडळाच्या उच्च किंवा निम्नश्रेणी परीक्षाची समकक्षता सोबतच्या परिशिष्टामध्ये दर्शविल्या प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे. प्रस्तुत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना उच्च किंवा निम्नश्रेणी परीक्षेला बसण्याची आवश्यकता नाही. डिसेंबर १९६६ते १०/६/७६या कालावधीत झालेल्या या संस्थांच्या परीक्षांची समकक्षता अजून ठरविण्यात आलेली नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(भि. ग. उक्षाणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्य मंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री, राज्य मंत्री यांचे स्वीय सहायक,

प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई, (पत्राने),
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई (पत्राने),
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई, (पत्राने),
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र १, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र २, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
प्रसिध्दी संचालक, (या वर्तमानपत्र प्रसिध्दी पत्रक काढावे या विनंतीसह),
सर्व जिल्हाधिकारी,
सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे,

कृ.मा.प. . .

सचिव, महाराष्ट्र राज्य गृह निर्माण मंडळ, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र राज्य वीज मंडळ, मुंबई,
आयुक्त, मुंबई कामगार कल्याण मंडळ, मुंबई,
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे,
निरनिराळ्या मंत्रालयीन विभागांखालील इतर सर्व विभागाध्यक्ष व कार्यालय प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभाग.

सौ. वैदय
२११९७७

# परिशिष्ट

| क्रमांक | संस्थेचे नांव | मान्यता दिलेल्या परीक्षा | रकाना क्र ३मधील हिंदी परीक्षांची शासकीय परीक्षेशी ठरविलेली समकक्ष परीक्षा | हिंदी अभ्यास मंडळाने मान्य केलेली शिफारस |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | हिंदी साहित्य संमेलन, अलाहाबाद | १) प्रथमा<br>२) मध्यमा( विशारद)<br>३) उत्तमा( हिंदी) साहित्यामधील) | १) निम्न श्रेणीपरीक्षा<br>२) उच्च श्रेणी परीक्षा<br>३) उच्चश्रेणी परीक्षा | |
| २. | राष्ट्रभाषा प्रचार समिती, वर्धा | १) परिचय<br>२) कोविद<br>३) रत्न | १) निम्नश्रेणी परीक्षा<br>२) उच्चश्रेणी परीक्षा<br>३) उच्चश्रेणी परीक्षा | |
| ३. | हिंदी प्रचार सभा, हैद्राबाद | १) विशारद<br>२) भूषण<br>३) विद्यावान | १) निम्नश्रेणी परीक्षा<br>२) उच्चश्रेणी परीक्षा<br>३) उच्चश्रेणी परीक्षा | |
| ४. | मुंबई हिंदी विद्यापीठ मुंबई | १) उत्तमा<br>२) भाषा रत्न<br>३) साहित्य सुधाकर | १) निम्नश्रेणी परीक्षा<br>२) उच्चश्रेणी परीक्षा<br>३) उच्चश्रेणी परीक्षा | |
| ५. | महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणे | १) प्रबोध<br>२) प्रवीण<br>३) पंडित | १) निम्नश्रेणी परीक्षा<br>२) उच्चश्रेणी परीक्षा<br>३) उच्चश्रेणी परीक्षा | |
| ६. | गुजरात विद्यापीठ अहमदाबाद | १) तिसरी<br>२) विनित<br>३) सेवक | १) निम्नश्रेणी परीक्षा<br>२) उच्चश्रेणी परीक्षा<br>३) उच्चश्रेणी परीक्षा | |
| ७. | दक्षिण भारत हिंदी प्रचार सभा-मद्रास | १) प्रवेशिका<br>२) विशारद<br>३) प्रवीण | १) निम्नश्रेणी परीक्षा<br>२) उच्चश्रेणी परीक्षा<br>३) उच्चश्रेणी परीक्षा | |
| ८. | आसाम राष्ट्रभाषा प्रचार समिती - गोहती | १) प्रबोध<br>२) विशारद | १) निम्नश्रेणी परीक्षा<br>२) उच्चश्रेणी परीक्षा | |
| ९. | मणिपूर हिंदी परीक्षा इम्फाळ [illegible] | १) प्रबोध<br>२) विशारद | १) निम्नश्रेणी परीक्षा<br>२) उच्चश्रेणी परीक्षा | |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| १० | हिंदुस्थानी प्रचारसभा मुंबई | १) तिसरी<br>२) काबील<br>३) विदवान | १) निम्नश्रेणी परीक्षा<br>२) उच्चश्रेणी परीक्षा<br>३) उच्चश्रेणी परीक्षा | मान्य |
| ११ | म्हैसूर हिंदी प्रचार परिषद बंगलोर | १) प्रवेश<br>२) उत्तमा<br>३) रत्न | १) निम्नश्रेणी परीक्षा<br>२) उच्चश्रेणी परीक्षा<br>३) उच्चश्रेणी परीक्षा | |
| १२ | केरळ हिंदी प्रचार सभा त्रिवेंद्रम | १) प्रवेश<br>२) भूषण | १) निम्नश्रेणी परीक्षा<br>२) उच्चश्रेणी परीक्षा | |
| १३. | हिंदीविद्यापीठ देवधर | १) प्रवेशिका<br>२) साहित्य भूषण<br>३) साहित्यालंकार | १) निम्नश्रेणीपरीक्षा<br>२) उच्चश्रेणी परीक्षा<br>३) उच्चश्रेणी परीक्षा | |
| १४. | भारतीय विद्यापीठ (ज्ञानलता मंडळ)- मुंबई | १) तृतीय<br>२) रत्न | १) निम्नश्रेणी परीक्षा<br>२) उच्चश्रेणी परीक्षा | |
| १५. | बम्बई हिंदी सभा मुंबई | १) विबोध<br>२) विशारद | १) निम्नश्रेणी परीक्षा<br>२) उच्चश्रेणी परीक्षा | |